नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २५५ | Issue - 255 | वार शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ | Blow- Saturday Date 1 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## भारत इंग्लंडविरूद्ध टी-२० मध्ये अजिंक्य! ३-१ ने मालिका विजय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : संघाची अष्टपैलू कामगिरी, भेदक गोलंदाजी, वादळी फलंदाजी अन् भारताने इंग्लंडविरूद्ध ३-१ च्या फरकाने मालिका विजय मिळवला. इंग्लंडविरूद्ध चौथ्या टी-२० सामन्यात १५ धावांनी आणि ३ चेंडू राखून विजय मिळवला. भारताचे गोलंदाज आणि शिवम दुबे-वरुण चक्रवर्तीचा बळी ठरला आणि इथ-ूनच इंग्लंडचा सामना भारताच्या बाजूने वळला. या सामन्यात रवी बिश्नोईने ४ षटकात केवळ २८ धावा देत तीन विकेट्स घेतल्या, तर हर्षित राणाने ४ षटकात ३३ धावा देत तीन महत्त्वपूर्ण विकेट मिळवले. याशिवाय वरुण चक्रवर्तीने २ तर अर्शदीप सिंग आणि अक्षर पटेलने प्रत्येकी १ विकेट घेतली.




नाणेफेक गमावल्यानंतर इंग्लंड संघाने भारताला प्रथम फलंदाजासाठी पाचारण केले. भारताच्या सलामीच्या जोडीने पहिल्याच षटकात १२ धावा करत दणक्यात सुरूवात केली. पण दुसऱ्या षटकात भारताला एक नव्हे तीन धक्के बसले. संजू सॅमसन आणि तिलक वर्मा पहिल्या दोन चेंडूवर झेलबाद झाले. तर तिसऱ्या चेंडूवर कर्णधार सूर्यकुमार यादव झेलबाद झाला. साकिब महमूदने एका षटकात ३ विकेट घेत एकही धाव दिली नाही. भारताची स्थिती दुसऱ्या षटकानंतर १२-३ अशी होती. पण यानंतर रिंकू सिंगने ३० धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत संघाचा डाव सा-वरला.

रिंकू सिंग बाद झाल्यानंतर टीम इंडिया पुन्हा अडचणीत आली. पण भारताचे दोन अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे यांनी ८७ धावांची विक्रमी भागीदारी रचत भारताला १८१ धावांची महत्त्वपूर्ण धावसंख्या उभारण्यात मदत केली. इतकंच नाही तर हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे यांनी शानदार अर्धशतक झळकावली. इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० मध्ये हार्दिक पांड्याने ३० चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५३ धावांची खेळी खेळली. तर शिवम दुबेने ७ चौकार आणि २ षटकारांसह ३४ चेंडूत ५३ धावा केल्या.

हार्दिक पंड्याने इंग्लंडकडून हा सामना हिसकावून घेतला. भारताने इंग्लंडला १८२ धावांचे आव्हान दिले होते. पण संघ १६६ धावांवर सर्वबाद झाला.

इंग्लंडचा संघ या सामन्यात १८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरला, तेव्हा बेन डकेट आणि फिल सॉल्ट या सलामीच्या जोडीने त्यांना चांगली सुरुवात करून दिली आणि पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. यावेळेस सामना भारताच्या हातून निसटतो का अशी भिती निर्माण झाली. पण ही भागीदारी तोडण्याचे काम टीम इंडियाचा युवा फिरकीपटू रवी बिश्नोईने केले. यानंतर भारतीय संघाला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी मिळाली. जोस बटलर केवळ २ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला, तर लियाम लिव्हिंगस्टन केवळ ९ धावा आणि जेकब बेथेल ६ धावाच करू शकला.

हॅरी ब्रूकने या सामन्यात एका टोकाकडून २६ चेंडूत ५१ धावांची खेळी खेळून निश्चितच इंग्लंडला सामन्यात कायम ठेवले, पण या मालिकेत तो पुन्हा एकदा

# विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात अंडा पुलाव, गोड खिचडी, नाचणी सत्व देण्याचा पर्याय

## मध्यान्ह भोजनासंबंधी राज्य सरकारने घेतला महत्वाचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सरकारी शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनात गोड पदार्थाचा समावेश करण्याबाबात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. पण य़ा निर्णयात एक अट घालण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या भोजनात या पदार्थांचा समावेश तेव्हाच केला जाईल जेव्हा शाळा व्यवस्थापन समित्या (डचउ) लोकसहभागातून निधी उभारून हे पदार्थ तयार करण्यासाठी लागणारी साखर खरेदी करतील. हा निर्णय तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी जून २०२४ मध्ये घोषित केलेल्या 'थ्री कोर्स मील' योजने-तील सुधारणांचा एक भाग आहे. शालेय शिक्षण विभागाने मंगळव-ारी या सुधारणांची घोषणा करणारा सरकारी आदेश जारी केला आहे. दरम्यान याबाबत राज्याच्या शालेय विभागाकडून माहिती देण्यात आली आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निम-ाण योजनेंतर्गत लोकसहभाग वाढवून विद्यार्थ्यांना पौष्टिक व वैविध्यपूर्ण आहार पुरविण्यासाठी शाळांमध्ये स्नेहभोजन उपक्रम राबविण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत, अशी माहिती राज्य शासनाकडून देण्यात आली आहे. तसेच शालेय व्यवस्थापन समितीस शक्य असल्यास शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अंडा पुलाव व गोड खिचडी, नाचणी सत्व याचा लाभ देण्याबाबतचा पर्याय शाळांना देण्यात आला असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

ठरवून देण्यात आलेल्या सुधारित रेसिपी सेटमध्ये दहा पदार्थ आहेत जे सध्याच्या मध्यान्ह भोजनासाठी देण्यात आलेल्या निधीच्या खर्चात तयार केले जाऊ शकतात. जेवणात विविधता आणण्यासाठी हे पदार्थ



वेगवेगळ्या दिवशी दिले जातील. या पदार्थांमध्ये दोन गोड पदार्थ आणि अंडा पुलावचा पर्याय देखील समाविष्ट करण्यात आला आहे. मात्र यासाठी सरकार कोणताही अतिरिक्त निधी देणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पात्र शाळांमधील पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. यामध्ये पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. तसेच योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून सवलतीच्या दरामध्ये प्रति दिन प्रति विद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरवण्यात येतो.



## मविआच्या काळात फडणवीस-शिंदेंना अटक करण्याचा कट रचला गेला का? महायुती सरकारकडून तपासासाठी एसआयटी स्थापन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर महाविकास आघाडीचे सरकार असताना खोटे गुन्हे दाखल करून अडकविण्याचा कट रचल्याचे षडयंत्र आ-खले गेले होते, असा आरोप भाजपाचे नेते प्रवीण दरेकर यांनी केला होता. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी दरेकर यांनी डिसेंबर महिन्यात नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात केली होती. आता या मागणीच्या आधारावर महायुती सरकारने सदर प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी स्थापन केली आहे. कायदा व सुव्यवस्थेचे पोलीस सह आयुक्त सत्यनारायण चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथक या प्रकरणाची चौकशी करेल.

महायुती सरकारने यासंबंधीचा शासन निर्णय ३१ जानेवारी रोजी काढला आहे. या विशेष तपास पथकात राजीव जैन (पो-लीस उपमहानिरीक्षक, एसआरपीएफ, म-ुंबई), नवनाथ ढवळे (पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६ मुंबई) आणि आदिकराव पोळ (सहायक पोलीस आयुक्त - मुंबई शहर) या तीन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तपास पथकाला अहवाल सादर करण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

भाजपाचे आमदार प्रवीण दरेकर यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात एक पेन ड्राईव्ह सादर केला होता. या पेन ड्राईव्हमध्ये सदर षडयंत्राचे स्टिंग ऑपरेशन असल्याचा दावा त्यांनी केला होता. पेन ड्राईव्ह सादर केल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी व्हावी, अशी मागणी केली. सभागृहात कॅबिनेट मंत्री शंभूराज देसाई यांनी सरकारतर्फे उत्तर देताना एसआयटी स्थापन केली जाईल, असे सांगितले होते. फडणवीस यांना अडकविण्यासाठी खोटा गुन्हा दाखल करण्याबाबत एक पोलीस उपायुक्त सामान्य नागरिकावर दबाव टाकत असल्याचे या व्हिडीओत दिसत असल्याचा दावा प्रवीण दरेकर यांनी केला होता.

विशेष म्हणजे मुंबईचे माजी पो-लीस आयुक्त परमबीर सिंह यांनीही अशाच प्रकारचा आरोप मागे केला होता. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना ते म्हणाले होते, शरद पवार यांचे निवासस्थान असलेल्या सिल्वर ओकवर बैठक पार पडली होती.

**गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड**

**पत्रकारांसाठी नवे उपक्रम आणि धोरणात्मक निर्णय जाहीर!**

# पत्रकारांनी निर्भय राहून समाजहितासाठी कार्य करावे : अशोक वानखेडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची जबाबदारी पार पाडताना पत्रकारांनी निर्भय आणि निःपक्षपाती राहणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या राजकीय, आर्थिक किंवा सामाजिक दबावाला बळी न पडता सत्य आणि निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून लोकशाही मजबूत करण्यासाठी पत्रकारांनी कार्य करावे, असे मत ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी व्यक्त केले.

मुंबईत आयोजित विशेष कार्यक्रमात न्यूज १८ चे वरिष्ठ पत्रकार गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी राज्यभरातील पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर झाली. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी नवे उपक्रम हाती घेण्याचा निर्धार नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला.

पत्रकारांसाठी नवीन धोरणे आणि उपक्रम,

नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष गो-विंद वाकडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पत्रकार आणि प्रशासन यांच्यातील समन्वय वाढवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कार्यरत राहील. शासनाच्या विविध योजनांचे जिल्हानिहाय सर्वेक्षण करून त्यासंदर्भातील अहवाल प्रकाशित करण्यात येतील, जेणेकरून प्रशासन आणि जनता यांच्यात योग्य समन्वय साधता येईल.

पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती स्थापन,

राज्यात पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांना आळा घालण्यासाठी पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती स्थ-ापन करण्यात आली आहे. या समितीसाठी पश्चिम महाराष्ट्र विभागासाठी सचिन चपळगावकर आणि कोकण विभागासाठी नवनाथ कापले यांची नेमणूक करण्यात आली.

महिला पत्रकारांसाठी विशेष योजना,

महिला पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र हेल्पलाइन आणि सुरक्षा यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव पत्रकार संघटनेने मांडला आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील महिला पत्रकारांना अधिक संधी मिळाव्यात, यासाठी विशेष उपक्रम राबवले जाणार आहेत.

पत्रकारांचे कल्याण आणि सुरक्षेसाठी ठोस निर्णय,

संघटनेच्या बैठकीत पत्रकारांच्या विमा योजना, पेन्शन योजना आणि डिजिटल मीडिया पत्रकारांच्या मान्यतेसाठी विशेष धोरण तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पत्रकारांचे हक्क अबाधित राहण्यासाठी आणि त्यांना सामाजिक सुरक्षा मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शासन दरबारी ठोस मागण्या करेल, असे पत्रकार संघाचे





सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले.

सत्कार समारंभात महाराष्ट्राच्या परंपरेचे दर्शन,

नूतन कार्यकारिणीच्या सत्कार सोहळ्यात पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी साईबाबांची मूर्ती, शाल, पुष्पगुच्छ, डायरी, बॅग आणि मिठाई देण्यात आली. विशेष म्हणजे, पारंपरिक खारीक-खोबऱ्याच्या हाराने सन्मान करून महाराष्ट्राच्या संस्कृतीशी नाळ जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित,

या कार्यक्रमाला राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार हेमंत जोशी, संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, ऑल इंडिया जनरल महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रणधीर कांबळे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमणी, सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

पत्रकार संघाच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचे निर्णय,

१. पत्रकारांसाठी कायदेशीर मदत केंद्र सुरू होणार

पत्रकारांवर होणाऱ्या हल्लयांच्या घटनांमध्ये न्याय मिळावा, यासाठी पत्रकार कायदेशीर मदत केंद्र सुरू करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.

२. ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे

ग्रामीण भागातील पत्रकारांना प्रशिक्षित करण्यासाठी जिल्हानिहाय विशेष कार्यशाळा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

३. पत्रकार संरक्षण कायदा आणण्यासाठी सरकारवर दबाव

पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र कायदा लागू करण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करण्याचे ठरले आहे.

४. पेन्शन आणि विमा योजना लागू करणे.

पत्रकारांसाठी पेन्शन आणि विमा योजना सुरू करण्यासाठी सरकारकडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणी असे- राष्ट्रीय अध्यक्षः अशोक वानखेडे, संस्थापक अध्यक्षः संजय भोकरे, प्रदेशाध्यक्षः गोविंद वाकडे, कार्याध्यक्षः निलेश सोमणी, प्रदेश उपाध्यक्षः अशोक देडे, किशोर रायसाकडा, डॉ. अभय कुमार दांडगे, नितीन शिंदे, महेश पानसे, इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रदेशाध्यक्षः अतुल परदेशी, सोशल मीडिया प्रदेशाध्यक्षः सिद्धार्थ भोकरे, पत्रकार हल्ला विरोधी समिती प्रमुखः किशोर पाटील, मंत्रालय संपर्कप्रमुखः नितीन जाधव, संघाचे प्रवक्तेः रमेश डोंगरे, विभागीय अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्यः महाराष्ट्रभरातील जिल्हाध्यक्ष व मान्यवर पत्रकार

**पत्रकार संघटनांची एकजूट गरजेची - संजय भोकरे,**

कार्यक्रमात बोलताना संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांनी सांगितले, पत्रकार संघटनांनी एकत्र येऊन सरकारवर दबाव वाढवला तरच पत्रकारांच्या हक्कांसाठी ठोस निर्णय घेतले जातील. पत्रकारांनी समाजहितासाठी निर्भय आणि निःपक्षपाती भूमिका घेतली पाहिजे.

**राज्य सरकारकडे पत्रकारांच्या मागण्यांसाठी पाठपुरावा करू - निलेश सोमानी**

प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी यांनी पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि कल्याणकारी योजनांसाठी राज्य सरकारकडे ठोस पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले, पत्रकारांच्या सुरक्षा, विमा योजना, पेन्शन आणि अन्य मागण्यांसाठी संघटना सरकारदरबारी पाठपुरावा करेल. पत्रकारांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी संघटना कायम त्यांच्या पाठीशी राहील.

**पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटना कटिबद्ध - डॉ. विश्वासराव आरोटे**

पत्रकार संघटनेच्या वतीने बोल-ताना डॉ. विश्वास आरोटे यांनी स्पष्ट केले की, पत्रकार सुरक्षेसाठी ठोस धोरण राबवावे, पेन्शन योजना लागू करावी आणि पत्रकारांसाठी विशेष विमा योजना आणावी यासाठी आम्ही सरकारकडे लवकरच ठोस मागणी करणार आहोत.

संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा,

या सोहळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नव्या नेतृत्वाने पत्रकारांसाठी सुरक्षाविषयक उपाययोजना, हक्कांसाठी लढा आणि पत्रकारितेच्या दर्जेदार भविष्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

हा कार्यक्रम महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीने पत्रकारांसाठी नव्या संधी, सुरक्षितता, विमा योजना, प्रशिक्षण आणि कायदेशीर मदतीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. हा निर्णय राज्यातील पत्रकारांसाठी नव्या युगाची सुरुवात ठरेल.

## संपादकीय....

### मध्यान्ह भोजन

राज्यातील सरकारी शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनात गोड पदार्थाचा समावेश करण्याबाबात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. पण य़ा निर्णयात एक अट घालण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या भोजनात या पदार्थांचा समावेश तेव्हाच केला जाईल जेव्हा शाळा व्यवस्थापन समित्या लोकसहभागातून निधी उभारून हे पदार्थ तयार करण्यासाठी लागणारी साखर खरेदी करतील. हा निर्णय तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी जून २०२४ मध्ये घोषित केलेल्या 'थ्री कोर्स मील' योजनेतील सुधारणांचा एक भाग आहे. शालेय शिक्षण विभागाने मंगळवारी या सुधारणांची घोषणा करणारा सरकारी आदेश जारी केला आहे. दरम्यान याबाबत राज्याच्या शालेय विभागाकडून माहिती देण्यात आली आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत लोकसहभाग वाढवून विद्यार्थ्यांना पौष्टिक व वैविध्यपूर्ण आहार पुरविण्यासाठी शाळांमध्ये स्नेहभोजन उपक्रम राबविण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत, अशी माहिती राज्य शासनाकडून देण्यात आली आहे. तसेच शालेय व्यवस्थापन समितीस शक्य असल्यास शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अंडा पुलाव व गोड खिचडी, नाचणी सत्व याचा लाभ देण्याबाबतचा पर्याय शाळांना देण्यात आला असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. ठरवून देण्यात आलेल्या सुधारित रेसिपी सेटमध्ये दहा पदार्थ आहेत जे सध्याच्या मध्यान्ह भोजनासाठी देण्यात आलेल्या निधीच्या खर्चात तयार केले जाऊ शकतात. जेवणात विविधता आणण्यासाठी हे पदार्थ वेगवेगळ्या दिवशी दिले जातील. या पदार्थांमध्ये दोन गोड पदार्थ आणि अंडा पुलावचा पर्याय देखील समाविष्ट करण्यात आला आहे. मात्र यासाठी सरकार कोणताही अतिरिक्त निधी देणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पात्र शाळांमधील पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. यामध्ये पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. तसेच योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून सवलतीच्या दरामध्ये प्रति दिन प्रति विद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरवण्यात येतो.

## आरोग्य सेवा विशेष लेख....

# गुईलेन बॅरे सिंड्रोम (GBS) या आजाराच्या नियंत्रणासाठी उपाययोजना

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

गुईलेन-बॅरे सिंड्रोम (GBS) हा एक गंभीर न्यूरोलॉजिकल रोग आहे, जो अचानक पॅरालिसीस आणि स्नायूंच्या दुर्बलतेसाठी ओळखला जातो. पुणे जिल्ह्यात या आजाराच्या वाढत्या प्रकरणांमुळे सार्वजनिक आरोग्य विभागाने तातडीच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. या लेखात, GBS च्या नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना, सूचना आणि जनजागृती या अनुषंगाने माहिती देण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्यातीत विविध रुग्णालयांतील G.B.Syndrome सदृष्य आजाराचे रूग्ण दाखल होत आहेत. याबाबत आरोग्य विभागामार्फत कार्यवाही सुध्दा होत आहे. आरोग्य विभागाशी चर्चा करून योगय त्या सुचना सुध्दा दिलेल्या आहेत. या आजाराबाबत न्युरोजलॉलीकल सोसायटी ऑफ पुणे यांच्या सुचना सुध्दा उपलब्ध आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा स्तरावर पुढील कार्यवाही आणि उपाययोजनांच्या दृष्टीने मार्गदर्शक सुचना पुढील प्रमाणे देण्यात येत आहेत.



१.आकस्मीक उद्भवणाऱ्या पॅरालिसीस (cute Progressive onset of Weakness) ची लक्षणे असलेल्या रुग्णाबाबत बाधित कार्यक्षेत्रात सर्व्हेक्षण करून, रुग्ण शोधुन त्यांच्यावर उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

२.खाजगी रुग्णालयांना संपर्क साधून अशाप्रकारचे रुग्ण आढळल्यास त्याबाबत जिल्हापरिषद, महानगरपालिकेस कळविण्यात यावे. जेणेकरून पुढील कार्यवाही वेळेत करता येईल.

३. आपल्या कार्यक्षेत्रात सर्व्हेक्षण कक्ष सतर्क राहतील आणि नवीन रुग्ण निदान होणाऱ्या भागात त्वरील सर्व्हेक्षण सुरू होईल. याबाबत दक्षात घ्यावी.

४. आजाराबाबत दैनंदिन अहवाल घेऊन पुढील उपाययोजना कराव्यात. तसेच covid19solapurgmail.com व idspsolapurrediffmail.com या ई-मेलवर दैनंदिन अहवाल सादर करण्यात यावा.

५. आपल्या रुग्णालयात उपचाराच्या सोयी सुविधा उपलब्ध राहतील Ventilator, Medicine याची खातरजमा करावी. तसेच उपलब्ध सुविधा असलेल्या रुग्णांलयांनी नागरीकांना आणि आपल्याला आरोग्य यंत्रणेला माहिती राहील यासाठी कार्यवाही होणे आवश्यक आहे. जेणेकरून योग्य ठिकाणी वेळेत रुग्णांना संदर्भित व भरती करात येईल.

६. रुग्णालयात भरती रुग्णांचे रक्त, लघवी व शौच नमुने NIV Pune येथे पाठवावेत.

७. सदर आजार अन्न किंवा पाणी दुषित असल्यास, दुषित अन्न किंवा पाण्याच्या माध्यमातून होऊ शकतो. त्यामुळे बाधित विभागातील पाणी पुरवठ्याची तपासणी करून लिकेजेस किंवा User End पाण्याची गुणवत्ता योग्य आहे का? याची तपासणी करून आवश्यकतेनुसार उपाययोजना करावी.

८. लोकांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात यावी.

९ सदर आजार हा सहसा अचानक उद्भवतो आणि ४ आठवड्यापर्यंत सुध्दा वाढत जाऊ शकतो. हा आजार सौम्य किंवा तीव्र स्वरूपात सुध्दा वाढू शकतो, त्यामुळे रुग्णभरती असलेल्या रुग्णालयात Ventilator सुविधा उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे.

१० काही प्रतिबंधात्मक सुचना-

अ.पिण्याचे पाणी दुषित राहणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. उदा.पाणी उकळून घेणे.

ब. अन्न स्वच्छ आणि ताजे असावे.

क.वैयक्तिक स्वच्छतेवर भर देण्यात यावा.

ड. शिजलेले अन्न आणि न शिजलेले अन्न एकत्रित न ठेवल्यास सुध्दा संसर्ग टाळता येईल.

११. पुढली लक्षणे आढळल्यास त्वरील वैद्यकिय मदत घेण्याबात जनजागृती करावी.

अ.अचानक पायातील किंवा हातात येणार अशक्तपणा, लकवा

ब. अचानकपणे उद्भवलेले चालण्यातील आस किंवा अशक्तपणा.

क. डायरिया (जास्त दिवसांचा)

उपरोक्त प्रमाणे मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात येत आहे.

जी बी एस च्या नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासन, सर्व संबंधित आरोग्य यंत्रणा व नागरिकांनी एकत्र येऊन कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून आपण या गंभीर आजाराचा प्रभाव कमी करू शकतो. हा आजार संसर्गजन्य नसल्याने नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही, फक्त योग्य खबरदारी घ्यावी. तसेच दूषित पाणी व कच्चे मांस खाऊ नये. या आजाराची लक्षणे आढळल्यास मेडिकल स्टोअरवरून औषधे न घेता तात्काळ वैद्यकीय सल्ल्याने उपचार घ्यावेत त्यामुळे या आजाराचा प्रभाव राहणार नाही.

**जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर**

गुईलेन-बॅरे सिंड्रोम (GBS) आणि आरोग्य सेवा उपाययोजना

**उपाययोजना**

१. रुग्ण शोधणे आणि उपचार करणे:

- आकस्मीक उद्भवणाऱ्या पॅरालिसीसची लक्षणे असलेल्या रुग्णांचे सर्व्हेक्षण करणे आवश्यक आहे. या रुग्णांवर तातडीने उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

२. खाजगी रुग्णालयांशी संपर्क:

- खाजगी रुग्णालयांनी GBS सारखे रुग्ण आढळल्यास जिल्हापरिषद आणि महानगरपालिकेस कळवणे आवश्यक आहे.

३. सर्व्हेक्षण कक्षाची दक्षता:

- आपल्या कार्यक्षेत्रात सर्व्हेक्षण कक्ष सतर्क राहतील आणि नवीन रुग्णांचे निदान होताच त्वरीत सर्व्हेक्षण सुरू केले जाईल.

४. दैनंदिन अहवाल:

- आजाराबाबत दैनंदिन अहवाल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात. अहवाल covid19solapurgmail.com आणि idspsolapurrediffmail.com येथे सादर करणे आवश्यक आहे.

५. उपचार सुविधा:

- रुग्णालयात वेंटिलेटर आणि आवश्यक औषधांची खातरजमा करणे महत्त्वाचे आहे.

६. रक्त, लघवी व शौच नमुने:

- भरती रुग्णांचे नमुने NIV पुणे येथे पाठवणे आवश्यक आहे.

७. पाण्याची गुणवत्ता तपासणी:

- अन्न किंवा पाणी दुषित असल्यास, पाण्याच्या पुरवठ्याची तपासणी करणे आवश्यक आहे.

८. जनजागृती:

- लोकांमध्ये GBS च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

९. वेंटिलेटर सुविधा:

- रुग्णालयात वेंटिलेटर सुविधा उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे, कारण हा आजार अचानक उद्भवतो.

१०. प्रतिबंधात्मक सूचना:

- पिण्याचे पाणी दुषित राहणार नाही याची काळजी घेणे.
- अन्न स्वच्छ व ताजे असावे.
- वैयक्तिक स्वच्छतेवर भर देणे.
- शिजलेले व न शिजलेले अन्न एकत्रित न ठेवल्यास संसर्ग टाळता येईल.

११. त्वरीत वैद्यकीय मदतीची आवश्यकता:

- खालील लक्षणे आढळल्यास त्वरीत वैद्यकीय मदतीसाठी जनजागृती करणे:
- अचानक पायातील किंवा हातात येणार अशक्तपणा.
- चालण्यात आलेला आस किंवा अशक्तपणा.
- दीर्घकालीन डायरिया.

**जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर**

# मूकनायक सारखी परिवर्तनवादी वर्तमानपत्रे ही काळाची गरज आहे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मित्र हो,

आपण सर्वांना ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० ला मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात केली होती. त्याला शतकापेक्षा जास्त काळ लोटला असून या ३१ जानेवारीला १०५ वा ऐतिहासिक वर्धापनदिन आहे. त्या अनुषंगाने वर्तमानात प्रचार प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात आपण नेमकेपणाने कुठल्या वळणावर आहोत? याची शहानिशा होणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या मूकनायक च्या दर्शनी भागावर काय करू आता धरुनिया भीड। नि:शंक हे तोंड वाजविले।।

नव्हे जगीं कोणी मुकीयांचा जाण। सार्थक लाजून नव्हे हित।।

अशा राष्ट्रसंत तुकोबारायांच्या अभंगातील ओळी उधृत केल्याचे दिसून येते. यावरून तुकोबारायांच्या विचारांच्या वैचारीक प्रगल्भतेची डॉ. आंबेडकरांनी जाणीवपूर्वक नोंद घेतल्याचे पहायला मिळते. अर्थात तुकोबारायांच्या विचारांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या परिवर्तनवादी विद्रोही विचारांचा वारसा पुढे चालविणाचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केलेल्या लिखाणावरून पहायला मिळतो.

या काळात समाज जीवनात नगण्य म्हणजे एक टक्क्याच्या आसपास जनता साक्षर होती त्या काळात आपल्या चळवळीच्या कार्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात केली होती. आज समाजात ८६ टक्के जनता साक्षर आहे. अशावेळी समाजात परिवर्तनवादी चळवळीच्या चालक, मालक व वाहक यांनी आपल्या स्वतंत्र विचारांच्या प्रचार प्रसार करण्यासाठी कशाप्रकारे वर्तमानपत्रे चालविली आहेत? याचा शोध घेणे आवश्यक आहे. मेडिया अर्थात प्रसार माध्यमाशिवाय काही होऊ शकत नाही असे ऊर बडवून सांगणायांनी सुद्धा पर्याय उपलब्ध करून जनसामान्यांपर्यंत त्याची व्याप्ती वाढविली तरच जनतेचे जनमत संघटीत करने शक्य होईल. अन्यथा शासनकर्ती जमात होण्याची स्वप्न पाहणे हे दिवास्वप्न ठरेल, यात तिळमात्र शंका नाही.

विषमतेचे माहेरघर असलेल्या भारतीय समाजात ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. अशी वर्णव्यवस्थाकृत परिस्थिती होती, म्हणून खालच्या मजल्यावरील इसम मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जीना उपलब्ध नव्हता. तर वरच्या मजल्यावरील माणूस कितीही नालायक असो त्याला खाली लोटून देण्याची कुणात हिंमत होत नसायची. अर्थात उच्च जातीत जन्मलेला मग तो कितीही अवगुणी असो, तो उच्च म्हणावयाचा तसेच नीच जातीत जन्मलेला मग तो कितीही गुणी असो, तो नीचच राहावयाचा. रोटी बेटी व्यवहारा अभावी स्पृश्यास्पृश्य भावनेने इतकी भर टाकलेली होती की, सर्व जाती या हिंदू समाजाचा अविभाज्य भाग असल्या तरी त्या समाज बाह्य असल्याची वास्तविकता होती. ज्यामुळे त्या काळात समाज हिंदू धर्मीय ब्राह्मण, ब्राह्मणेत्तर व बहिष्कृत अशा तीन वर्गात विभागल्या गेला होता. परिणामी वर्णवर्चस्वाच्या प्रभावामुळे ब्राह्मण हे ब्राह्मणेत्तरांकडून सेवा करवून घेऊन मेवा खात होते. अज्ञानी व्यक्ती कडून काहीही करून घेता यावे म्हणून ज्ञानाची मिरासदार ब्राह्मणांनी स्वतःकडे वर्गीकृत केली होती. परिणामी दीर्घकाळ पर्यंत ब्राह्मणेत्तर मागासलेले राहिल्याने त्यांची उन्नती खुंटली. अशाप्रकारे दौर्बल्य, दारिद्र्य व अज्ञान या त्रिवेणी संगमातून बहिष्कृत, अस्पृश्य, वंचित बहुजन समाजाची अपरिमित हानी झाली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी अस्पृश्यांच्या हिताची चर्चा करणारी सोमवंशीय मित्र, हिंदू नागरिक, विटाळ विध्वंसक इत्यादी पत्रे उपजली व लय ही पावलीत. मात्र दीनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी मराठा, ज्ञानप्रकाश, सुबोध पत्रिका यासारखी बुद्धीवादी पत्रे तत्कालीन परिस्थितीत सुद्धा सुरू होती. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक ची सुरुवात केली. त्या काळात बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीच्या बातम्या इतर वर्तमानपत्रे प्रसिद्ध करीत नव्हते, असा काही फारसा मुद्दा नव्हता. इतर अनेक वर्तमानपत्रे बातम्या निश्चित प्रसिद्ध करीत होते. मात्र नेमकेपणाने जे मांडले जाणे अपेक्षित होते ते मात्र होत नव्हते. म्हणून आपणांस हवे ते, हव्या त्या प्रमाणात योग्य पद्धतीने सविस्तर मांडण्यासाठी आपल्या स्वतंत्र वर्तमानपत्राची निकड भासल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० ला मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात केली. या पाक्षिकात अग्रलेख, क्षेम समाचार, शेला पागोटे, कुशल प्रश्न, विविध विचार, वर्तमानसार, आमची जखम, आमची हालचाल इत्यादी सदर चालविली जात होती. ज्याचा पी. एन. भटकर हे सुरुवातीला संपादक होते. मूकनायकचा नोंदणी क्रमांक १४३० असा होता. आजच्या काळात बहुजन समाजातील पक्ष, संघटना, संस्थाच्या अपवादात्मक बातम्या प्रस्थापित वर्तमानपत्रात येत असतात. ज्यात प्रास्ताविक, सुत्रसंचालन, आभार व अध्यक्षता कुणी केली? भाषणे कुणी दिली? याचा उल्लेख तर असतो सोबत कार्यकर्त्यांचा नामोल्लेख केलेला असतो, त्यावर ही कार्यकर्ते वर्तमानपत्रात नाव छापून आल्याबद्दल आनंदी असतात. मात्र कार्यक्रमात मुद्यांवर जे काही मांडले जाते त्याचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळला जातो याचे कार्यकर्त्यांना भानच नसते. उलटपक्षी ते जास्त महत्त्वपूर्ण असते. करिता वर्तमानपत्रात केवळ न्यूज नव्हे! तर व्ह्यूज अर्थात व्यक्त होणाऱ्याचा दृष्टीकोन समोर येण्याची आवश्यकता असते. म्हणून आपण व्ह्यूज प्रकाशित करणारी परिवर्तनवादी विचारांच्या प्रसार माध्यमांना, वर्तमानपत्राना चालना देऊन त्यांना आपण वाचकवर्ग मिळवून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. वर्तमान पत्र वाचताना दोन आळीतील व दोन ओळी मागील अर्थ समजून घेण्याचा नीटसा प्रयत्न केला पाहिजे. आपली परिवर्तनवादी वर्तमानपत्रे चालविणे, टिकविणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. ती आपण कर्तव्य भावनेने पार पाडली पाहिजे.

मूकनायकच्या द्वितीय अंकातील 'स्वराज्याची सर सुराज्याला नाही!' या अग्रलेखात हिंदी लोक स्वयंशासित नाहीत तर परशासित आहेत. राज्य करण्याचे दोन मुख्य हेतू असतात एक म्हणजे शासन करने व दुसरे म्हणजे संस्कृती टिकविणे होय. हे नमूद करताना इंग्रजी विद्या म्हणजे केवळ वाघिणीचे दुध ते ज्यांना प्राशन करावयास सापडेल त्यांच्यात नवा उत्साह, नवीन तेज, नवीन स्फुर्ती उत्पन्न होईल हे स्पष्ट केले आहे. परिणामी हे वाघिणीचे दुध पिऊन पुष्ट झालेल्या पिल्लांनी इंग्रजांच्या सत्तेच्या विरुद्ध प्रजा पक्षाच्या वतीने भांडण्यास सुरूवात केली. याची पुनरावृत्ती पुनरावृत्ती होऊ नये याची जाणीव शासकांना असते. म्हणून ते जनतेला व्यापक प्रमाणात जागृत करीत नसतात. करिता आपल्या देशातील उच्च दर्जाचे शिक्षण देण्याऐवजी शाळाच बंद करण्याचा घाट घातला जात आहे. तर जे काही शिक्षण दिले जाते ते संबंधित विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सक्षम ठरत नसल्याने बेरोजगारांच्या फौजा निर्माण होत आहेत.

वर्तमान काळात परिवर्तनवादी चळवळीच्या पार्श्वभूमीवर चालविल्या जाणाऱ्या प्रसार माध्यमांचे वाहक होणे आवश्यक आहे. देशात भारताचे संविधानाला अनुरुप विधायिका, कार्यपालिका, न्यायपालिका व प्रसार माध्यमे या लोकशाहीच्या चारही स्तंभाना बळकटी प्राप्त करून देण्यासाठी प्रसार माध्यमांनी, वृत्तपत्रांनी आपल्या लेखणीचा वापर केला पाहिजे. जेणेकरून या देशातील सर्व नागरिकांना त्यांचे मानवीय हक्क अधिकार उपभोगता आली तर भारतीय सभ्य समाजाची निर्मिती होऊ शकेल. याचे भान ठेवून प्रस्थापित प्रसार माध्यमांना झिडकारून परिवर्तनवादी प्रसार माध्यमांना स्थापित करण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या ऊर्जेचा वापर केला पाहिजे. परिणामी मूकनायकला अपेक्षित प्रसार माध्यमांचा समाज जीवनात उत्कर्ष होईल. जेणेकरून भारताचे संविधानाला अपेक्षित एकजिनसी भारतीय समाज तयार होईल. करिता आपण सर्वांना ऐतिहासिक मूकनायकच्या वर्धापनदिनानिमित्त कोटी कोटी सदिच्छा व्यक्त करतो.

**लेखक : बी. बी. मेश्राम**, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.

संपर्क : ९४२१६७८६२८

stdbbm@gmail.com

# पडघा सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी रमेश पाटील बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

भिवंडी तालुक्यातील विविध गावातील शेकडो सभासद संख्या असलेल्या पडघा गृप विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी रमेश पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.



मावळते सभापती गुरुनाथ मते यांनी राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार निवडणूक अध्यासी अधीकारी एल. व्ही भेरे यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा सोसायटीच्या कार्यालयात घेण्यात आली यावेळी सभापती पदासाठी रमेश रामचंद्र पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापती पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.

यावेळी १३ संचालकापैकी उपसभापती सुरेश पाटोळे, दत्तात्रेय पाटोळे, डॉ. संजय पाटील, गुरूनाथ मते, वंसत म्हात्रे, देवीदास पाटील, भारती घावट, दिलीप पाटील, राजाराम जाधव, दिपक जाधव हे संचालक उपस्थित होते. तर सभापती पदावर पाटील यांची निवड होताच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भिवंडी बाळासाहेब पाटील, सचीव ज्ञानेश्वर म्हात्रे, डोहोळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य सचीन घोडविंदे, शिवसेना ठाकरे गट उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर, माजी सभापती अजय पाटील अरुण गोरले कुंरूद सोसायटीचे संचालक भगवान सांबरे, मोहन पालवी, चंद्रकांत पाटील, राहुल पाटील सहसचिव शितल कशीवले यांनी पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

# आदिवासी पाड्यातील शाळेला लागला मिटर : पाण्याचा देखील सुटणार प्रश्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद आदिवासी पाडा ( आनंद नगर) बोरीवली मराठी शाळेत विद्यार्थ्यांना गर्मीमध्ये बसावं लागत आहे. शाळेला वीज नसल्यामुळे ,शाळेला पाण्याची देखिल गैरसोय होत आहे. शाळेच्या सोयी सुविधांकडे बोरीवली ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. म्हणून पालकांनी,गावकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. ही बातमी दैनिक यशसिद्धी न्यूज वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर बोरीवली ग्रामपंचायतीने या शाळेकडे गांभीरपूर्वक लक्ष देऊन. शाळेला तात्काळ मीटर लावल्यानंतर शाळेने प्रजासत्ताक दिन आनंदाने साजरा करीत, बोरिवली ग्रामपंचायतीचे शाळेकडून आभार व्यक्त करण्यात आले. तर विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### घरासमोर सांडपाणी टाकल्याच्या कारणावरून काठीने मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) घरासमोर सांडपाणी टाकल्याच्या कारणावरून हाताने व काठीने मारहाण करून शिवीगाळ केल्याप्रकरणी केल्याची घटना २९ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास प्रताप नगर तांडा येथे घडली.याप्रकरणी सुरताबाई लक्ष्मण जाधव (वय-७०,रा.बंजारा सोसायटी,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून मीराबाई रमेश राठोड (रा.प्रताप नगर तांडा) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांची मुलगी सुनिता राठोड हिच्या घरी फिर्यादी जात असताना फिर्यादी यांच्या मुलीच्या शेजारी राहणारी मिराबाई राठोड हिने फिर्यादी यांच्या मुलीच्या घरासमोर सांडपाणी टाकले.याबाबत फिर्यादी यांनी विचारणा केली असता,त्यावेळी मीराबाई राठोड हिने चिडून फिर्यादी यांना काठीने व फिर्यादी यांच्या मुलीस हाताने मारहाण करून शिवीगाळ केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

# दक्षिण तालुक्यातील सर्व प्रकल्प मार्गी लावणार : आमदार सुभाष देशमुख

## दक्षिण तालुक्यात समृद्ध गाव अभियान कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जनतेने जो विश्वास दाखवला आहे तो स्वार्थ करण्यासाठी कटिबद्ध आहे बोलण्यापेक्षा कृतीवरच भर देऊन मी काम करणार आहे मी आहे आपल्याकडे खासदार जमीन मुबलक पाणी आहे आता गरज आहे योग्य दिशा देण्याची दक्षिण तालुक्यातील पुढील पाच वर्षात अनेक प्रकल्प मार्गी लावून तालुका मॉडेल करायचा मानस आहे यासाठी सर्वांनी साथ द्यावे असे प्रतिपादन आमदार सभा देशमुख यांनी केले सोलापूर सोशल फाउंडेशन आणि शिक्षण सोलापूर समृद्ध गाव अभियान तालुकास्तरीय कार्यशाळा किल्लेदार मंगल कार्यालय येथे झालेल्या यामध्ये आमदार देशमुख बोलत होते या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून समृद्ध गाव अभियान समितीचे जिल्हाप्रमुख व चिंचणी चे प्रणेते मोहन आणि व्याख्याते उपसरपंच नागेश कोकरे हनुमंत कुलकर्णी नामदेव पवार रायबा शेवट शेट्टी डॉक्टर सेनगावंडाळे संघाप्पा खेरके राम जाधव अतुल गायकवाड आदी उपस्थित होते.

आमदार देशमुख पुढे म्हणाले की जिल्ह्यातील समृद्ध गाव करीत असताना तालुका समृद्ध करणे आवश्यक आहे दक्षिण तालुक्यातील पुढील पाच वर्षात देगाव जेलसोतू दुग्धबी तलाव वडापूर कालवा मंद्रूप एमआयडीसी सेना नदीवरील ब्रिज कायम भंडारी जलसंधारण माध्यमातून तलावणारा खोलीकरण करून पडलेले पावसाचे थेंब वाचाने ते काम करणे शाळा दर्जेदार करून शाळेचे गुणवत्ता वाढवणे व शैक्षणिक सर उंचावणे व शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे मदत करून तालुक्यामध्ये कृषी क्रांती करणे आधी कामे करायचे आहे त्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊन

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण पर्यटन वाढीसाठी संधी या विषयावर मोहन अनफडे आणि मनोगत व्यक्त केले चिंचणीच्या विकासात आमदार देशमुख यांचे योगदान मोठे असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली मोठे काम सुरू आहे असेही ते मनाली व नागेश कोकरे यांनी समृद्ध गाव अभियान आराखडा व अंमलबजावणी या विषयावर मार्गदर्शन केले सर्व लोकप्रतिनिधी सर्व शासकीय योजनेची माहिती जाणून घेत त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे गावाचा समृद्ध आराखडा तयार करा समिती




तयार करा वित्त आयोगाचा आराखडा सक्षम बनवा आम्हाला गाव जिल्हा समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करा अशी आव्हान केले प्रास्ताविक हनुमंत कुलकर्णी यांनी केले तर आभार प्राध्यापक विजयकुमार गरजदार यांनी मानले



# माघ यात्रेनिमित्त पंढरपुरातील वाहतूक मार्गात बदल

सोलापूर/पंढरपूर,दि.३० (जिमाका) : माघ शुध्द एकादशी शनिवार दि. ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी असून, माघ यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात मोठ्या प्रमाणात भाविक येतात. यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील तसेच शहरा बाहेरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा बदल ०२ ते १२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीपर्यंत राहणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

पंढरपूर शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांना सूचना:- पंढरपूरात यात्रे निमित्त अहिल्यानगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने अहिल्यादेवी चौक, शेटफळ चौक मार्गे मोहोळ रोड विसावा येथे पार्क करावीत. ६५ एकर येथे फक्त दिंडी व पालखीचे वाहने पार्क करावीत. पुणे,सातारा,वाखरी,मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, टाकळी बायपास मार्गे येवून वेअर हाउस येथे पार्क करावीत. तसेच विजापूर, मंगळवेढा मार्गे येणारी वाहने टाकळी बायपासमार्गे वेअर हाऊस व यमाई तुकाई मंदीर येथे पार्क करावीत.

पंढरपूर शहरातून बाहेर जाणाऱ्या वाहनांबाबत सूचना:- पंढरपूर शहरातून टेंभुर्णी, अहिल्यानगर, सोलापूर, लातूर, बीड, उस्मानाबादकडे जाणारी सर्व वाहने सावरकर चौक, नवीन कराड नाका, कॉलेज क्रॉस रोड, कौठाळी बायपास , नवीन सोलापूर नाका मार्गे जातील. पुणे-साताऱ्याकडे जाणारी वाहने सावरकर चौक, नवीन कराड नाका, कॉलेज क्रॉस चौक, वाखरी मार्गे जातील तर विजापूर, कराड, आटपाडी, कोल्हापूर, सांगली, मिरज, मंगळवेढा मार्गे जाणा-या सर्व गाड्या सावरकर चौक, नवीन कराड नाका येथून टाकळी बायपास व गादेगाव फाटा मार्गे जातील.

पंढरपूर शहरातील अंतर्गत वाहतुकीबाबत:- ०६ ते ९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत प्रदक्षिणा मार्ग ,महाव्दार चौक ते शिवाजी चौक,सावरकर चौक ते शिवाजी चौक मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद असेल. बार्शी, सोलापूर मार्गावरुन येणारी तीन रस्तामार्गे येणारी हलकी वाहने फक्त अंबाबाई पटांगणात उतरतील. नियमित ट्रक व यात्रेसाठी सोडण्यात येणाऱ्या एस.टी. बसेसना जुना दगडी पुल, नवीन पुल व तीन रस्ता मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंगळवेढा नाका, महात्मा फुले चौक , लहुजी वस्ताद चौक या मार्गाने येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंदी आहे. अंबाबाई पटांगण ते भजनदास चौक, अंबाबाई पटांगण ते अर्बन बँक, शिवाजी चौक ते अर्बन बँक, संकुल कार्नर ते नगरपालिका मार्ग हा मार्ग पासेसच्या वाहना व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या वाहनासांठी बंद ठेवण्यात येणार आहे.

पार्किंग व्यवस्था सूचना :- अहिल्यानगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने आहिल्या चौक, तीन रस्ता मार्गे मोहोळ रोड विसावा व नगरपालिकेच्या वाहनतळावर पार्किंग करतील. तसेच ६५ एकर येथे दिंडी व पालखीची वाहने पार्कींग करतील. पुणे, सातारा, वाखरी, मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, टाकळी मार्गे येवून वेअर हाऊस येथे पार्क करावीत. विजापूर, मंगळवेढाकडून येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळी मार्गे वेअर हाऊस येथे पार्कींग करावीत. यात्रा कालावधीत शहरात येणारी हलकी वाहने अंबाबाई पटांगण, गजानन महाराज मठ, नगरपालिका पार्कींग, क्रीडा संकुल तसेच संबधीत मठामध्ये पार्क होतील. शहरातील अंतर्गत रोडवर कोणत्याही ठिकाणी गाड्या पार्क करण्यास मनाई असेल.

एकेरी मार्ग:- कॉलेज क्रॉस रोड ते सरगम चौक ते सावरकर चौक ते नवीन कराड नाका यामार्गावर एकेरी वाहतुक राहील.

संबधित भाविकांनी व वाहनधारकांनी या बदलेल्या वाहतूक मार्गाची नोंद घेऊन वाहतूक कोंडी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी यांनी केले आहे.

# श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या विवाह सोहळा; श्री रूक्मिणी स्वयंवर कथेस प्रारंभ



**भागवताचार्य कु. साध्वी अनुराधा दिदी शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने कथेचे निरूपण**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा माघ शुध्द १ ते ५ या कालावधीत संपन्न होत असून, मुख्य दिवस वसंत पंचमी म्हणजे दिनांक ०२ फेब्रुवारी रोजी आहे. त्या निमित्ताने श्री विठ्ठल सभामंडप येथे दुपारी ०४.०० ते सायं ०६.०० या वेळेत श्री रूक्मिणी स्वयंवर कथेचे आयोजन करण्यात आले असून, त्याचे निरूपण श्री क्षेत्र पंढरपूर येथील प्रख्यात श्रीमद् भागवताचार्य कु. साध्वी अनुराधा (दिदी) राजेंद्र शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. श्री रूक्मिणी स्वयंवर कथा दि. ३० जानेवारी ते ०१ फेब्रुवारी या दरम्यान दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी मंदिर समितीने केली असून, परंपरेनुसार वसंत पंचमी दिवशी स.१०.०० ते १२.०० या वेळेत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा संपन्न होत आहे. त्या दिवशी येणा-या भाविकांना अन्नछत्रात विशेष भोजनाची व्यवस्था, मंदिर समितीचे संकेतस्थळ, फेसबुक, युट्यबवरून थेट प्रेक्षपण, मंदिर परिसरात एलईडी स्क्रिन, स्वच्छता , मंडप, मंदिरात आकर्षक फुलांची सजावट, सुरक्षारक्षक नियुक्ती तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर दुपारी प्रदक्षिणा मार्गावर शोभा यात्रा काढण्यात येणार असल्याचेही मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री श्रोत्री यांनी सांगितले.

# राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाच्या ठाणे जिल्हाध्यक्षपदी शोभा म्हात्रे



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महाराष्ट्र प्रदेश, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ओबीसी विभागाच्या ठाणे जिल्हाध्यक्ष पदावर शोभा म्हात्रे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

शोभा सुधाकर म्हात्रे नेहमीच सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक राजकीय, उपक्रमात सहभागी होत असतात. नागरिकांचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार ) पक्षाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे काम करीत असतात. म्हणुन त्यांच्या कार्याची दखल घेऊन

तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांना अभिप्रेत असणारी संघटना बांधणीसाठी व पक्ष बळकटीसाठी व पक्ष मजबूत करण्यासाठी, पक्षाची ध्येय धोरणे समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी भिवंडी तालुक्यातील कोनगाव येथील शोभा सुधाकर म्हात्रे यांची महाराष्ट्र प्रदेश, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ओबीसी विभागाच्या ठाणे जिल्हाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे नेते डॉ. जितेंद्र आव्हाड, कल्याण,डोंबिवली जिल्हा अध्यक्ष डॉ. वंडारशेठ पाटील , प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांच्या हस्ते शोभा म्हात्रे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या ओबीसी प्रदेश सचिव राजेश्री कदम , महीला सरचिटणीस कुसुम गेडाम ,

ओबीसी महाराष्ट्र प्रदेश संघटक ,सचिव मुकेश पाटील, सामाजिक न्याय (डउ) महिला कल्याण जिल्हा अध्यक्ष शालिनी ठमके उपस्थित होत्या. तर त्यांच्या नियुक्तीनंतर विविध क्षेत्रातून शोभा म्हात्रे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.

राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार ) गट पक्षाने माझ्यावर विश्वास ठेवून जबाबदारी दिलेली आहे. ती मी व्यवस्थित पार पाडून पक्ष वाढण्यासाठी एकनिष्ठ राहून,प्रामाणिकपणे काम करेल असे यावेळी महाराष्ट्र प्रदेश, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ओबीसी विभागाच्या ठाणे जिल्हाध्यक्षा शोभा म्हात्रे यांनी बोलतांना सांगितले.



# महात्मा गांधी यांच्या कार्याचा अभ्यास करावा : सोमशेखर स्वामी

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत मोलाचे योगदान देणारे महात्मा गांधी यांचे कार्य प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा अभ्यास करावा तसेच अहिंसा, सत्य तत्त्वज्ञानाचा स्वीकार करावा असे प्रतिपादन अक्कलकोट पंचायत समिती, शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, इतिहास व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाने आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी केंद्र प्रमुख इस्माईल जमादार होते. व्यासपीठावर मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, केंद्र समन्वयक गौरीशंकर कोळी, केंद्र प्रमुख सुरेश शटगार उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, महात्मा गांधीजींनी 'माझ्या सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रात स्वतःच्या जीवनातील प्रसंगाचे चित्रण केले आहे. आयुष्य जगत असताना मानवाने स्वीकारावयाची तत्त्वे सांगितली आहेत, त्यातून बोध घेतला पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन डॉ शितल झिंगाडे यांनी केले तर आभार डॉ बाळासाहेब पाटील यांनी मानले. कार्यक्रमास सुरेश रुग्गे, प्रा मनीषा शिंदे,प्रा. प्राची गणाचारी, मधुबाला लोणारी, विद्या बिराजदार व विद्याश्री वाले उपस्थित होते.

**परिचारक समर्थकांची पोलीस ठाण्यात तक्रार**

**दोन दिवसात गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र आंदोलन करणार; माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर यांचा इशारा**

# मोहोळचे आमदार राजू खरे यांच्या गुन्हा दाखल करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मोहोळ जामदार राजू खरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी भाजप पदाधिकारी आक्रमक झाले तीन दिवसांपूर्वी एका सार्वजनिक कार्यक्रमात मोहोळचे व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार राजू खरे यांनी पंढरपूरचे माजी आमदार स्वर्गीय सुधाकर पंत परिचारक यांच्यावर टीका केली व या टिके वरून भाजप पदाधिकारी आणि परिचारक समर्थकांनी आज पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्याबाबत निवेदन दिले आहे.




तात्काळ गुन्हा न दाखल झाल्यास पंढरपूर शहरांमध्ये तीव्र आंदोलन करण्याचा इशारा माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर यांनी दिला आहे.

यावेळी माझी नगरसेवक राजू सर्वगोड भाजप शहराध्यक्ष विक्रम पापरकर माजी नगरसेवक नवनाथ रानगट, सचिन शिंदे, भीमशक्ती तरुण मंडळाचे अध्यक्ष उमेश सर्व गोड कृष्णा वाघमारे, निलेश आगवणे भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष प्राजक्ता बेणारे, दत्तात्रय धोत्रे बालाजी बंदपट्टे माजी नगरसेवक निलेश बडवे नारायण सिंगर महादेव धोत्रे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते

तीन दिवसांपूर्वी जिंगीकर परिवाराच्या वतीने माढाचे आमदार अभिजीत पाटील आणि मोहोज आमदार राजू खरे सत्कार समारंभात आमदार राजू खरे यांनी माजी आमदार स्वर्गीय सुधाकर यांच्या परिचारक यांच्या अनाजीपंत असा उल्लेख केला तसेच त्यांच्याबद्दल जातीवादी उद्गार काढले असा आरोप परिचारक समर्थक यांनी केला आहे.

यावेळी बोलताना माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर म्हणाले की स्वर्गीय सुधाकर म्हणते परिचारक यांनी सर्व जाती धर्माच्या पदाधिकाऱ्यांना घेऊन पंढरपूरचा विकास केला आहे.

एखाद्या व्यक्तीच्या निदानंतर त्या व्यक्तीवर टीका करणे ही कुठली राजकारण आहे? तुम्हाला नगरपालिका निवडणुकीसाठी स्टंटबाजी करायचे हे मात्र अशी स्टंट माझी अशी टीका करण्यापेक्षा थेट नगरपालिका निवडणुकीच्या मैदानात उतरा जनता योग्य त्या नेत्याच्या उमेदवारांना संधी देईल मात्र अशा प्रकारे टीका आता सहन केली जाणार नाही दोन दिवसांमध्ये आमदार राजीव खरे यांच्यावर गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.

# विठ्ठल रूक्मिणीमातेच्या विवाह सोहळ्यासाठी पोशाख प्राप्त

## व्यवस्थापक मनोज श्रोत्री; बेंगलोर येथील सविता चौधरी व इतर दोन भाविकांकडून पोषाख प्राप्त

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
पंढरपूर /प्रतिनिधी

श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा माघ शुध्द १ ते ५ या कालावधीत संपन्न होत असून, दिनांक २ फेब्रुवारी रोजी वसंत पंचमी निमित्त साजरा होणाऱ्या विवाह सोहळ्यासाठी पोशाख प्राप्त झाला आहे. हा विवाह सोहळा परंपरेनुसार पार पाडण्यात येणार असून,त्याची जय्यत तयारी मंदिर समितीने केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री रूक्मिणी स्वयंवर कथा दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी या दरम्यान दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. परंपरेनुसार वसंत पंचमी दिवशी स.१०.०० ते १२.०० या वेळेत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा संपन्न होत आहे. कथेचे निरूपण क्षेत्र पंढरपूर येथील प्रख्यात श्रीमद् भागवताचार्य कु. साध्वी अनराधा राजेंद्र शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने सुरू आहे.

वसंत पंचमी दिवशी पहाटे काकडा आरती वेळेस श्री विठ्ठलास सोन्याच्या मुखुटा ऐवजी मंदिल पांढरे पागोटे घालण्यात येते. (या दिवसापासुन श्री विठ्ठलास पांढरा पोशाख रंगपंचमी पर्यत सुरू होतो.) पहाटे नित्यपुजेच्या वेळेस देवास गुलाल टाकण्यात येतो तसेच श्री रूक्मिणी मातेकडे काकडा आरती व नित्यपुजेच्या वेळेस वसंत पंचमी निमित्त फक्त याच दिवशी सकाळी पांढरा पोशाख करण्यात येतो (इतर वेळी श्री रूक्मिणी मातेस पांढरा पोशाख परीधान करीत नाहीत) नित्यपुजेच्या वेळेस रूक्मिणी मातेस गुलाल टाकण्यात येतो.

सकाळी ११.०० वा. श्री विठ्ठलाची तुळशी पूजा करण्यात येते. त्यावेळेस श्रीस पांढरा पोशाख करण्यात येतो. तसेच श्री विठ्ठलास गुलाल टाकुन श्रीस विवाह स्थळी येण्याचे निमंत्रण दिले जाते. तसेच श्री रूक्मिणी मातेस पांढरा पोशाख व अलंकार परीधान केले जातात. त्यानंतर श्री रूक्मिणी मातेची पाद्यपुजा करून नैवेद्य, आरती करण्यात येते. श्री रूक्मिणी मातेस गुलाल टाकला जातो व रूक्मिणी मातेस विवाह स्थळी येण्याचे निमंत्रण दिले जाते. दु.१२.०० वाजता श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेची प्रतिकात्मक मुर्ती श्री विठ्ठल सभामंडपामध्ये आणुन विधीवत मंत्र उच्चारासहीत विवाह सोहळा संपन्न होतो.

तद्नंतर दुपारी ४.००वाजता पोशाखानंतर श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेची पाद्यपुजा करण्यात येते. त्यानंतर श्री विठ्ठल व रूक्मिणी मातेच्या प्रतिकात्मक मुर्तीची प्रदक्षिणा मार्गाने सवाद्य शोभा यात्रा काढण्यात येते. व्ही.आय.पी. गेट - श्री संत नामदेव पायरी महाव्दार पोलीस चौकी - कालिका देवी मंदिर - काळा मारूती चौफाळा नाथ चौक तांबडा मारूती मंदिर माहेश्वरी धर्मशाळा - महाव्दार पोलीस चौकी श्री संत नामदेव पायरी पश्चिमव्दार व्ही. आय.पी. गेट या मार्गाने शोभा यात्रा काढण्यात येणार आहे.



श्रींसाठी बेंगलोर येथील सविता चौधरी व इतर दोन भाविकांकडून पोषाख प्राप्त झाले आहेत. सदरचा सोहळा जास्तीत जास्त भाविकांना पाहता यावा यासाठी चौफाळा व महाद्वार पोलीस चौकी येथे एलईडी स्क्रिन बसविण्यात येणार आहेत. तसेच त्याच ठिकाणी अक्षता वाटप होणार आहे. त्यादिवशी दुपारी १२ ते सायं. ७ पर्यंत अन्नछत्र सुरू ठेवण्यात येणार असल्याचेही मंदिर समितीचे व्यवस्थापक श्रोत्री यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### कारच्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू

सोलापूर, (प्रतिनिधी) : घरच्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना १४ जानेवारी रोजी दुपारी पावणे चार वाजण्याच्या सुमारास कलेक्टर बंगल्यासमोर घडली. पल्लवी प्रफुल्ल दळवी (वय-६९,रा.सोलापूर) असे मयत वृध्द महिलेचे नाव आहे.याप्रकरणी प्रफुल्ल भालचंद्र दळवी (वय-७२,रा.संजय बंगला,दत्तनगर,सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून किरण कांबळे (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीएफ.७२९४ यावरून रंगभवन चौकाकडून जात होते. त्यावेळी माणिक चौकाच्या दिशेने कार क्रमांक एम.एच.१२.एच.झेड.७४०५ येत असताना यातील वरील संशयित आरोपी याने त्याच्या ताब्यातील कार निष्काळजीपणाने चालून फिर्यादी यांच्या दुचाकीला मागून धडक दिली. त्यावेळी फिर्यादी यांची पत्नी या गंभीर जखमी होऊन मृत्यू पावल्या.तसेच फिर्यादी प्रफुल्ल दळवी यांना देखील दुखापत करण्यास कारणीभूत होऊन तेथून पळून गेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक जगताप हे करीत आहेत.

### महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण पळविले

सोलापूर (प्रतिनिधी) घराशेजारी एका घरात स्वयंपाकासाठी जात असताना पाठीमागून अचानक अज्ञात एका चोरट्याने येऊन फिर्यादी वैशाली दत्तात्रय पुजारी (वय-४६,रा. संतोष नगर,जुळे सोलापूर) यांच्या गळ्यातील ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेले आहे. ही घटना ३० जानेवारी रोजी दुपारी पावणे पाच वाजण्याच्या दरम्यान जुना संतोष नगर येथे घडली. या प्रकरणी वैशाली पुजारी यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार हार हे करीत आहेत.

# घाटकोपर येथील हिंदुस्थान कंपोजिट्स लिमिटेड कंपनी मधील १९०० कामगारांच्या ३० वर्षांच्या प्रदिर्घ लढ्याला यश

## उद्धव ठाकरे यांच्या हस्ते थकित महागाई भत्ता धनादेशाचे वितरण





**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
घाटकोपर/केतन भोज : घाटकोपरच्या हिंदुस्थान कंपोजिट्स लिमिटेडमधील ११०० कामगारांना शिवसेनेने न्याय मिळवून दिला आहे.हिंदुस्थान कंपोजिट्स लिमिटेड कंपनी मधील ११०० कामगारांना ३० वर्षांच्या प्रदिर्घ लढ्यानंतर थकीत महागाई भत्ता (डीए) मिळाला. या महागाई भत्त्याचं वितरण मातोश्री येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते काही कामगारांना करण्यात आले.

या वेळी शिवसेना नेते सुभाष देसाई, सचिव विनायक राऊत, मा.नगरसेवक/घाटकोपर पश्चिम विधानसभा समन्वयक शिवभक्त संजय भालेराव, आ.सुनील राऊत, मा.महापौर महादेव देवळे तसेच कामगार संघटनांचे नेते यावेळी उपस्थित होते व उर्वरित कामगारांना सायंकाळी घाटकोपर येथील एस.एन.डी.टी हॉल येथे महागाई भत्त्याचं वितरण करण्यात आले.

# पंढरपूरला अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर करा : माऊली हळणवर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुबंई/प्रतिनिधी : आज मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेबांची भाजपाचे नेते माऊली भाऊ हळणवर यांनी निवेदनाद्वारे मागणी केली की सोलापूर हा जिल्हा क्षेत्रफळाने प्रचंड मोठा आहे सोलापूरला इतर तालुक्यातून येणे जाणे १५० ते १६० किलोमीटर अंतर होते शासकीय कामाला जनतेला दोन-चार हेलपाटे घालावे लागतात प्रचंड गर्दी होते त्यामुळे कामे होयाला विलंब लागतो. पंढरपूर हे तीर्थक्षेत्राचे ठिकाण असून पंढरपूरला येण्या जाण्यासाठी चारी बाजूंनी नॅशनल हायवे चे जाळे आहे रेल्वे आहे या ठिकाणी अगोदरच हिवताप जिल्हा कार्यालय जिल्हा सत्र न्यायालय असे अनेक कार्यालय या ठिकाणी आहेत वर्षातून पंढरपूरला चार वाऱ्या भरतात कायमस्वरूपी या ठिकाणी व्हीआयपी लोकांची गर्दी असते त्यामुळे येथील अधिकाऱ्यांवरती ताण येतो तसेच पंढरपूरच्या आजूबाजूंनी असलेल्या माळशिरस माढा करमाळा सांगोला मंगळवेढा या तालुक्यातील लोकांना येणे जाणे सोपे आहे. म्हणून पंढरपूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय झाल्यास सोलापूर जिल्ह्याचे दोन भाग होतील त्यामुळे गर्दी कमी होऊन कामाची उरक लवकर होईल. म्हणून पंढरपूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर करून या सोलापूर जिल्ह्यातील लोकांना दिलासा द्यावा अशी विनंती भारतीय जनता पार्टीचे नेते माऊली हळणवर यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्याकडे केली असता मंत्री महोदयांनी सकारात्मक विचार असल्याचे सांगून मंत्रिमंडळ यावर लवकरच निर्णय घेईल असे आश्वासन दिले.

# जि. प. भिनार मराठी शाळेत व ग्रामपंचायतमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
भिवंडी प्रतिनिधी/ मिलिंद जाधव :



भिवंडी तालुक्यातील जिल्हा परिषद भिनार शाळेत, तसेच भिनार ग्राम पंचायत मध्ये २६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी भिनार ग्रामपंचायतच्या प्रांगणात भिनार येथील सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांच्या हस्ते ध्वज रोहन करण्यात आले. तसेच केंद्र शाळा भिनार येथे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड होते.

यावेळी भिनार गावचे सरपंच भरत घाटाल, उपसरपंच जयेश भोईर, माजी सरपंच विलास भोईर , माजी सरपंच साक्षी भोईर, किरण भोईर, ग्रामसेवक संजय पाटील, मुख्याध्यापिका .विशे, प्रदिप हरड, रविकांत गुळवी, मानसी पंडित, नरेश जाधव, तर आदी उपस्थित होते. विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले तर भगवान गायकवाड यांनी कविता सादर करत प्रबोधन केले. तर सुत्रसंचालन स्नेहा विशे यांनी केले.

# ग्रामपंचायत अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करुन निलंबित करण्याची मागणी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
धाराशिव/सुधाकर रणदिवे :

प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि नागरिकांना माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य पद्धत आखून देण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा पारित करण्यात आलेला आहे, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह निर्माण करणे; व्यवहारात पारदर्शकता आणणे; शासन यंत्रणेचे प्रजेला जाब देण्यासाठी उत्तरदायित्व ठरविणे ही या कायद्याची काही उद्दिष्टे आहेत. या कायद्याची उपयुक्तता आणखीन जास्त चांगल्या रीतीने सिद्ध व्हावी म्हणून जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आपली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडल्यास जनतेला मोठा दिलासा मिळून त्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत होऊ शकते.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सन २०१६ ते सन २०२० पर्यंत ग्रा.पं जवळे दु. येथील शासनाच्या १४व्या वित्त आयोगाच्या प्राप्त झालेल्या एकूण निधीमधून आज पर्यंत अखर्चित ठेवलेली रक्कम किती आहे व ती कोणत्या विकास कामाची रक्कम अखर्चीत ठेवली आहे याची माहिती दि.

१९-९-२०२४ रोजी श्री प्रकाश सोनार यांनी पंचायत समितीकडे मागितली होती;त्यावरून सदर माहिती ही ग्रामपंचायतशी संबंधित असल्यामुळे पंचायत समितीने




### ग्रामसेवकाची मनमानी

सदर अर्ज ग्रामसेविका श्रीमती डांगे.पी.एम यांच्याकडे दि.३०-९-२०२४ रोजी या अधिनियमाच्या कलम ६(३) नुसार वर्ग करण्यात आला होता व मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्याचे सूचित केले होते, परंतु श्रीमती डांगे. पी.एम यांनी नकारात्मक दृष्टिकोनातून मागितलेली माहिती देण्यास हेतू पुरस्सरपणे टाळाटाळ केली त्यामुळे व्यथित होऊन सोनार यांनी दि. २९-१०-२०२४ रोजी पंचायत समितीकडे प्रथम अपील दाखल केले, दि.१९-१२-२०२४ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सात(७) दिवसात माहिती पुरवावी असा निर्णय देवून आदेश पारित केला; त्यानंतरही श्रीमती.डांगे. पी.एम यांनी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशाकडेही जाणिवपूर्वक नकारात्मक दृष्टीने पाहून आदेशाचे पालन केले नाही.अशा पद्धतीने माहिती अधिकार कायद्याचा उद्देश साध्य होत नाही ही अत्यंत खेदाची बाब असल्याचे सांगत प्रकाश सोनार यांनी नाराजी व्यक्त केली.

माहिती अधिकार कायद्यातील कार्यपद्धतीचे अनुपालन न करता अर्जदारास /अपीलकर्त्यास त्रास होईल अशी कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध संबंधित कार्यालय प्रमुखांनी त्वरित शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करावी तसेच जनतेच्या निवेदने/अर्जाच्या निपटार्याबाबत अधिकारी/ कर्मचारी हेतूपुरस्सर दुर्लक्ष करीत असेल अगर निर्णय घेण्यास टाळाटाळ करीत असेल तर अशा कर्मचारी अधिकारी यांच्याविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी असे शासनाचे आदेश आहेत. शासनाच्या आदेशाप्रमाणे संबंधित ग्रामपंचायत अधिकारी/ग्रामसेविकाविरुद्ध त्वरित शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांना सेवेतून निलंबित करण्याची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची त्यांच्या सेवा पुस्तिकेमध्ये नोंद घेण्यात यावी असे श्री प्रकाश सोनार यांनी धाराशिवचे जिल्हाधिकारी यांचेकडे ३० जानेवारी २०२५ रोजी निवेदन दिले आहे.

## बार्टीतील कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ करण्याचे दिले निर्देश — ना. श्री. संजय शिरसाट

# २५ हजार विद्यार्थ्यांसाठी नवीन वस्तीगृह उभारणार

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असलेल्या (बार्टी)संस्थेस आज भेट दिली याचा मला अभिमान असून सामाजिक न्याय विभागात अनेक समस्या आहेत याची मला जाणीव आहे. परंतु आपल्याला या विभागात अनेक बदल करावयाचे आहेत. समाज कल्याण व बार्टीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांने प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडावेत.

आपल्या जीवनात आलेल्या संकटांना न डगमगता आपण पुढे वाटचाल करून आपले ध्येय निश्चित करावेत. राज्यातील सामाजिक न्याय विभागातील सर्व वस्तीग्रहात विद्यार्थ्यांना आद्यवत सेवा सुविधा उपलब्ध करुन देऊन २५ हजार विद्यार्थ्यांसाठी नविन वस्तीग्रह उभारण्यात येणार असल्याचे मत राज्याचे सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाचे मंत्री मा. नामदार संजयजी शिरसाठ यांनी बार्टी संस्थेत बोलतांना व्यक्त केले.




२९ जानेवारी रोजी मा ना श्री संजय शिरसाट यांनी समाज कल्याण आयुक्त कार्यालयात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा आढावा घेतला. तसेच त्यांनी बार्टी संस्थेच्या मुख्यालयाला सदिच्छा भेट दिली.

यावेळी बोलताना ना. श्री शिरसाट यांनी त्यांच्या संघर्षमय जीवनातील अनेक आठवणीला उजाळा दिला. गेल्या दहा वर्षापासून बार्टीतील १२०० कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पगार वाढ झाली नाही. पगारवाढ करण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी मा. मंत्री महोदय यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती निवेदनाची दखल घेऊन सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पगारवाढ निश्चितच केली जाईल मी आपल्या सोबत असल्याचे सांगून वेतन वाढ करण्याचे निर्देश दिले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मा ना श्री संजय शिरसाट यांनी विनम्र अभिवादन केले.

बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी मा मंत्रीमहोदय यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, जयभीम ही कविता भेट देऊन स्वागत केले.

तसेच बार्टीतील विविध योजनांची माहिती देऊन आपल्या मार्गदर्शनाखाली बार्टीतील सर्व योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी काम करत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी विशेष कार्य अधिकारी श्री अभय देशमुख, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, उमेश सोनवणे, लेखाधिकारी योगिता झानपुरे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन श्री रामदास लोखंडे यांनी केले.आभार निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांनी मानले.